# अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

जावक क्रमांक ५-०८/४३ अं.न.प./नरवि/बां.प.

अंबरनाथ नगरपरिषद कार्यालय, अंबरनाथ

दिनांक : १८/४/२००५

सुधारीत बांधकाम परवानगी

श्री/श्रीमती प्रभावती महादेव सावंत यांचे कु.मु.प.धा. श्री. तरीन आर. शहा, द्वारा- श्री डी. एच. वैद्य, वास्तुशिल्पकार बदलापूर

विषय : स.नं. ८८ हि.नं. — सि.स.नं. ६९५७ प्लॉट नं. —

मौजे अंबरनाथ येथे बांधकाम करण्याच्या मंजूरी बाबत.

संदर्भ : आपला दि. १७/३/२००५ चा

श्री. डी. एच. वैद्य

वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेले अर्ज.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये.

स.नं. ८८ हि.नं. — सि.स.नं. ६९५७ भूखंड क्रमांक —

मौजे अंबरनाथ मध्ये ६३००.०० चौ.मी. भूखंडाच्या विकास करावयास महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. १७/३/२००५ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे तळघर / स्टील्ट, तळ मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, ~~चौथा मजला~~ रहाणेसाठी दुकाने / ~~ऑफिस~~ / दवाखाना, हॉस्पिटल / शाळेसाठी / ... भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम परवाना / प्रारंभ प्रमाण पत्र देण्यात येत आहे.

[इमारत क्र. ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०] तळ + तीन मजले

## -: अटी :-

१ ही बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्ष पर्यंत वैध असेल नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नूतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशाप्रकारचे नूतनीकरण फक्त तीन वर्ष करता येईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमाचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुशंगाने छाननी करण्यात येईल.

२ नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३ **मे. जिल्हाधिकारी ठाणे, यांजकडून बांधकाम चालू करावयाचे अगोदर बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी तुमच्यावर** राहील व बिनशेतीच्या परवानगीची एक सत्य प्रत काम सुरु करावयाचे पंधरा (१५) दिवस अगोदर नगरपरिषदेकडे पाठविणे आवश्यक राहील.

४ बांधकाम चालू करण्यापूर्वी (७) दिवस आधी नगरपरिषद कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

५ ही परवानगी आपल्या मालकीच्या ताब्यातील जमिनी व्यतिरिक्त जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

६ बांधकाम या सोबत मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल. जोत्यापर्यंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र नगरपरिषदेस सादर करण्यात यावे. त्यानंतरच जोत्यावरील बांधकाम करावे.

९३९३/२०१२